पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी-३९.
जा.क्र.इक्षेका/४/कावि११७०/२०१७
दिनांक- ३१/०८ /२०१७

**प्रति,**

**मा.----------------------------**
सदस्य/सदस्या
इ प्रभाग समिति
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
भोसरी-३९.

**विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक ७/९/२०१७ रोजी दुपारी ३.००वा. आयोजित केलेबाबत.**

**महोदय / महोदया,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा **गुरुवार दिनांक ०७/०९/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता** इ क्षेत्रीय कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिति

प्रत- १. सर्व संबंधित शाखाप्रमुख
२. कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग समिती
कार्यपत्रिका क्रमांक – ०२

दिनांक- **०७/ ०९/२०१७** रोजी वेळ- दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक ०७/०९/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता इ क्षेत्रीय कार्यालयातील **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

अ) दिनांक ०१/२/२०१७ रोजीची रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका ११) सभावृत्तांत कायम करणे.
ब) दिनांक ०१/०३/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका १२) सभावृत्तांत कायम करणे.
**क)** दिनांक ७/८/२०१७ रोजी झालेल्या सभापती निवडीची विशेष सभा (कार्यक्रमपत्रिका०१) सभावृत्तांत कायम करणे.

**विषय क्र.१–** ठेकेदार पध्दतीने नाले व गटरसाफ करणे या लेखाशिर्षामधून ठेकेदार पध्दतीने हायसिंथ निर्मूलन करणे या लेखा शिर्षावर तरतुद वर्ग करणे बाबत...

इ क्षेत्रीय कार्यालयाकडील आरोग्य विभागामध्ये सन २०१६ -२०१७ चे अंदाज पत्रकीय तरतुद मध्ये आरोग्य विभागातील ठेकेदार पध्दतीने नाले व गटरसाफ करणे या लेखाशीर्षावर तरतुद र.रू २३,००,०००/- करणेत आलेली आहे. नाले सफाईची र.रु १२,२३,५५७/- ची निविदा काढण्यात आली. या लेखाशिर्षावर र.रु १०,७६,४४३/- शिल्लक आहे. तसेच स्ट्रॉर्म वॉटर पावसाळी गटर्स साफसफाई करणे हे लेखाशिर्षावर इ क्षेत्रीय आरोग्य विभागाकडे तरतुद करण्यात आली नाही. त्यामुळे स्ट्रॉर्म वॉटर पावसाळी गटर्स साफसफाई करणेयाची र.रु. ३,०१,८०६/- इतक्या रकमेची निविदा काढणेत आली आहे. या दोन्हीची एकुण ररु. १५,२५,३६३/- वजाजाता र.रु. ७,७४,६३७/- इतकी रक्कम शिल्लक राहते. ठेकेदारपध्दतीने हायसिंथ निर्मूलन करणे या लेखाशिर्षावर आज दि. ३१/५/२०१६ रोजी र.रु. १०,०००/- इतकी तरतूद शिल्लक आहे. तसेच आर्थिक वर्ष सन २०१५-१६ मधील मे. दत्तकृपा स्वयंरोजगार संस्था यांचे इंद्रायणी नदीपात्रातील जलपर्णी/ हायसिंथ काढणे कामाचे उर्वरीत बील र रु. ३९३४८/- त्या आर्थिक वर्षात तरतूद शिल्लक नसल्यामुळे सदरचे बील चालू आर्थिक वर्षात अदा करणे आवश्यक आहे. त्यामुळे ठेकेदारी पध्दतीने नाले व गटर साफ करणे या लेखाशिर्षावरुन सदरची रक्कम वर्ग करता येणे शक्य आहे. तरी ठेकेदार पध्दतीने नाले व गटरसाफ करणे या लेखाशिर्षामधून ठेकेदार पध्दतीने हायसिंथ निर्मूलन करणे या लेखाशिर्षावर र रु. ३५,०००/- इतकी रक्कम वर्ग करता येणे शक्य आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०३ अन्वये एका अर्थसंकल्पीय शिर्षातून दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षात वर्ग करावयाच्या रकमा नियमानुसार वर्ग करता येत असल्याने सदरचा विषय मा.प्रभाग समिती पुढे मान्यतेकामी ठेवण्यात यावा.

मा.सभापती यांचे मान्यतेने ऐनवेळचे विषय घेणे.

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ क्षेत्रीय कार्यालय
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी-३९
जा.क्र.इक्षेका/४/कावि/११७०/२०१७
दिनांक- ३१/०८ /२०१७